# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईदर, वसई-विरार
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

**कार्यालयाचा पत्ता-** रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे

फोन नंबर ०२२ - २९४५१००१

Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट १०६/२०२५** **दि. ०४/०३/२०२५**

## प्रेस नोट

**मि.भा.व.वि पोलीस आयुक्तालयातील सायबर विषयक जनजागृती मोहीमेकरीता सायबर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर व पोलीस उप निरीक्षक प्रसाद शेनोलकर यांना "बालस्नेही पुरस्कार" २०२४ प्रदान.**

राज्यातील बालकांच्या सर्वांगिण विकास, बाल विकास हक्क संरक्षण, त्यांची सुरक्षा व आरोग्य इत्यादी अनेक महत्वपुर्ण विषयांवर अनेक प्रशासकिय यंत्रणा तसेच इतर संस्था सकारात्मक पध्दतीने मौलाचे कार्य पार पाडत आहेत. अश्या व्यक्तींना वा संस्थांना त्यांचे मौलिक कार्याकरीता **"बालस्नेही पुरस्कार"** या पुरस्काने सन्मानित करण्यात येते. सन २०२४ च्या **"बालस्नेही पुरस्कार"** करीता मि.भा.व.वि पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकारी पोनि सुजितकुमार गुंजकर व पोउनि प्रसाद शेनोळकर यांनी उत्कृष्ट पोलीस निरीक्षक व उत्कृष्ट पोलीस उप निरीक्षक या नामांकन प्रकारात बालस्नेही पुरस्कार मा मंत्री महिला व बाल विकास विभाग कुमारी अदीती तटकरे यांचे प्रमुख उपस्थितीत माननीय सुश्री बेन शाह, अध्यक्षा राज्य बाल हक्क आयोग व माननीय श्रीमती अश्वती दोरजे, अपर पोलीस महासंचालक महीला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे हस्ते प्रदान करण्यात आलेला आहे. सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

महाराष्ट्र राज्यातील सर्व पोलीस आयुक्तालय व सर्व पोलीस परीक्षेत्रातील पोलीस अधिकारी/ पोलीस अंमलदार यांनी महिला व बालकांच्या सुरक्षा, विकासाच्या दृष्टीने केलेल्या उत्कृष्ट कामगिरी केली असल्यास त्यांची नामांकने जानेवारी २०२५ मध्ये कामगिरीसह मागविण्यात आलेली होती.

मा. श्री. मधुकर पांडेय, पोलीस आयुक्त यांनी मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालयामध्ये सायबर विषयक जनजागृती मोहीम राबविण्याबाबत सुचना दिलेल्या होत्या, त्या प्रमाणे सन २०२३ मध्ये एकुण २२ व सन २०२४ मध्ये एकुण ४२ शाळा व महाविदयालये तसेच गणपती मंडळे, नवरात्री मंडळे, रहिवाशी सोसायटी, संस्था कार्यालये, धार्मिक स्थळ (चर्च) अशा विविध ठिकाणी सायबर विषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच महिला, लहान मुले, तरुण पिढी यांचेकडुन सोशल मिडीया/इंटरनेटचा वापर होत असताना काय खबरदारी घ्यावी याबाबत योग्य व सविस्तर माहिती सायबर पोलीस ठाणे यांचेकडुन वेळोवेळी आयोजित कार्यक्रमांमध्ये देण्यात आली आहे. तसेच सायबर विषयक जनजागृती करीता राबविण्यात आलेली इंस्टाग्राम रिल स्पर्धा, पथनाट्य स्पर्धा या सारख्या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे देखील आयोजन करण्यात आलेले होते. सायबर पोलीस ठाणे यांनी केलेल्या कामाची दखल घेवुन मि.भा.व.वि पोलीस आयुक्तालयातर्फे पोनि सुजितकुमार गुंजकर व पोउनि शेनोळकर यांची पुरस्काराकरीता नामांकन पाठविण्यात आले होते.

सदरचा कार्यक्रम महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व महिला व बाल विकास विभाग, युनिसेफ यांचे संयुक्त विद्यमाने सोमवार, दिनांक ०३/०३/२०२५ रोजी दुपारी ०१.०० वा यशवंतराव चव्हाण सेंटर, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता.

बालस्नेही पुरस्कार या राज्यस्तरीय कार्यक्रमामध्ये महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, राज्यमंत्री पंकज भोयर, आमदार संजय केळकर, आमदार मनिषा कायंदे, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभागाचे अपर पोलीस महासंचालक अश्वती दोरजे, आयोगाचे माजी आयुक्त प्रशांत नारनवरे, आयोगाचे सचिव लक्ष्मण राऊत यांचे हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.


महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग
बाल स्नेही


महाराष्ट्र राज्य
बाल हक्क संरक्षण आयोग
"मी
बाल स्नेही"

---